# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट ता. १६/०१/२०२४

### सराईत तडीपार आरोपी करण कुमार जाधव व त्याचे साथीदारास दोन गावठी कट्टयासह अटक

### (एमआयडीसी भोसरी पोलीसांची कारवाई)

दि.१४/०१/२०२४ रोजी ००/३५ वाचे सुमारास पोलीस उपनिरीक्षक श्री. अशोक तरंगे, पोहवा १०२२ दातार व पोशि १३१९ खांबट असे वन मोबाईलवरुन हवालदारवस्ती मोशी पुणे भागात रात्रगस्त पेट्रोलिंग करत असताना आम्हास बातमीदारां मार्फत बातमी मिळाली की, तडीपार इसम नामे **करण कुमार जाधव वय २६ वर्षे रा. लक्ष्मीनगर मोशी पुणे** हा एका रिक्षा क्रमांक एमएच १४ / एचएम/६४४९ मधुन पिस्टल घेवुन सिल्व्हर लक्ष सोसायटी मोशी परिसरात फिरत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने आम्ही मोशी मार्शलवरील पोशि हंबर्डीकर यांना फोन करुन बोलावुन घेवुन आम्ही पंच व मार्शलसह पेट्रोलिंग करुन रिक्षाचा शोध घेत असताना सदरची रिक्षा सिल्व्हर लक्ष सोसायटी मोशी पुणे समोरील खदानचे कच्च्या रस्त्यावरुन जात असताना दिसल्याने सदरची रिक्षा पाठलाग करुन थांबवुन त्यातील दोन्ही इसम खदानचे दिशेने अंधाराचा फायदा घेवुन अंधारात पळुन जाऊ लागले असता पळुन जाणाऱ्या इसमांपैकी एकास पाठलाग करुन स्टाफचे मदतीने शिताफीने ०१/१५ वा पकडुन ताब्यात घेतले. सदर इसमाची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला एक पिस्टल व एक जिवंत राउंड मिळुन आल्याने पोहवा ए.एस.दातार यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने एमआयडीसी भोसरी पो स्टे गु.रजि नंबर.२७/२०२४ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२७) म.पो.अधि १४२, ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपीस गुन्हयात अटक करुन त्याची पोलीस कस्टडी घेतली असता त्याचेकडे पोलीस कस्टडीमध्ये अधिक तपास करता त्याने त्याचा मित्र **स्वप्निल पोपट घुले वय ३० वर्षे रा. घुलेवस्ती, मांजरी पुणे** यास एक गावठी पिस्टल व एक जिवंत राऊंड दिला असल्याचे सांगितल्याने सदर इसमाचा मांजरी येथे जावुन शोध घेतला असता त्याचेजवळ एक गावठी पिस्टल व एक जिवंत राऊंड मिळुन आला असुन, त्यास सदरच्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच पळुन गेलेल्या इसमाचा शोध सुरु असुन, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राजेंद्र पानसरे करत आहे.

**आरोपी करण कुमार जाधव याचेवर यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१) भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ७४/२०१२ भादंवि कलम ३९९ ४०२
२) भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ३०२/२०१६ भादंवि कलम ४५४, ३८०
३) भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ३०३/२०१६ भादंवि कलम ३९२, ३४
४) भोसरी पोलीस ठाणे, गुरनं २९४/२०१६ भादंवि कलम ४५४, ३८०
५) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ११३/२०१७ भादंवि कलम ४५७, ३८०, ३४
६) निगडी पोलीस ठाणे, गुरनं २११/२०१८ भादंवि कलम ४५७, ३८०, ३४
७) निगडी पोलीस ठाणे, गुरनं २१/२०१८ भादंवि कलम ४५७, ३८०, ३४
८) निगडी पोलीस ठाणे, गुरनं ३४/२०१८ भादंवि कलम ४५७, ३८०, ३४
९) निगडी पोलीस ठाणे, गुरनं २२७/२०१८ भादंवि कलम ३७९, ३४
१०) निगडी पोलीस ठाणे, गुरनं २८३/२०१८ भादंवि कलम ४५७, ३८०, ३४
११) विश्रांतवाडी पोलीस ठाणे गुरनं.३५/२०१८ भादवि कलम ३७९, ३४
१२) चाकण पोलीस ठाणे, गुरनं ४०९/२०१८ भादंवि कलम ४५७, ३८०, ३४
१३) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, गुरनं १३६/२०१८ भादंवि कलम ३७९, ३४
१४) पिंपरी पोलीस ठाणे, गुरनं ६५/२०१८ भादंवि कलम ३७९, ३४

**१५) पिंपरी पोलीस ठाणे, गुरनं ९३/२०१८ भादंवि कलम ३७९, ३४**
**१६) चाकण पोलीस ठाणे, गुरनं १६१/२०२० भादंवि कलम ३०२, १४३,१४७,१४९ म.पो.अधि.३७(१) १३५**
**१७) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ४२८/२०२१ भादंवि कलम ३९२, ३६५, ३४**
**१८) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, गुरनं २८०/२०२२ मुंबई ॲक्ट कलम १४२**
**१९) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ३७३/२०२२ मुंबई ॲक्ट कलम १४२, आर्म ॲक्ट ४(२५) म.पो.अधि.३७(१) १३५**
**२०) भोसरी पोलीस ठाणे, गुरनं ६३०/२०२२ भादवि कलम ३८०**

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस सहआयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.वसंत परदेशी सो, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदीप डोईफोड सो, पोलीस उपआयुक्त गुन्हे शाखा, पिंचिं, मा. डॉ. शिवाजी पवार सो, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड, मा. डॉ. विवेक मुगळीकर सो, सहा. पोलीस आयुक्त, एमआयडीसी भोसरी विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.राजेंद्र निकाळजे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन, श्री. अशोक तरंगे, पोलीस उपनिरीक्षक, श्री. राजेंद्र पानसरे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार अमोल दातार, पोहवा चंद्रकांत गवारी, पोहवा शरद गांधीले, पोहवा गणेश बोराटे, पोहवा राहुल लोखंडे, पोशि भागवत शेप, पोशि नितीन खेसे, पोशि विशाल काळे, पोशि जयदीप खांबट, पोशि हंबर्डीकर, पोशि देवकर व पोहवा राजु जाधव, पोउपआ कार्यालय परि ३ पिंचिं यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.शिवाजी पवार)**
पोलीस उपआयुक्त
परि-३, पिंपरी चिंचवड